MHKO100010412024

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४३/२०२४**

बसवंत शिंगे वगैरे.
//वि//
वसंत शिंगे.

**निशाणी क्र. १४ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वि.प. यांनी त्यांचेविरुध्द झालेला "म्हणणे नाही" चा आदेश रद्द करुन म्हणणे दाखल करण्याची परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार तर्फे प्रस्तुत अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम २(३) अन्वये दाखल केलेला आहे. वि.प. यांना नोटीसीची बजावणी दिनांक १३/०९/२०२४ रोजी होऊन ते हजर झाले. परंतु, त्यांनी मुदतीत म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे, त्यांचेविरुध्द अर्ज विना म्हणणे चालविणेबाबत आदेश दिनांक १०/०३/२०२५ रोजी पारीत करणेत आला. वि.प. यांनी सदरचा अर्ज दिनांक २३/०९/२०२५ रोजी दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत प्रकरणात वि.प. यांनी असे कारण नमुद केलेले आहे की, वि.प. हे दैनंदिन रोजंदारीच्या कामावर जात असतात. दरम्यानच्या काळात वि.प. हे रोजंदारीच्या कामावर कर्नाटकातील जैनापूर येथे गेले असलेने त्यांची मुदतीत वकीलांची भेट झाली नाही व त्याप्रमाणे कागदपत्रे दाखवून मुदतीत म्हणणे दाखल करता आले नाही. त्यामुळे, त्यांना मुदतीत म्हणणे दाखल करण्यास विलंब झालेला आहे. प्रत्यक्षात सदर कारण व वि.प. यांनी म्हणणे दिल्याचा काळ विचारात घेतले असता, सदर कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतु, प्रकरणाची गुण-दोषावर निर्गती करण्यासाठी वि.प. यांना त्यांचा बचाव मांडणेकामी संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे, वि.प. यांना त्यांचे म्हणणे सादर करु देणे मला योग्य वाटते. वर नमुदप्रमाणे वि.प. यांनी प्रस्तुतचा अर्ज विलंबाने दाखल केलेला असल्याने प्रस्तुत अर्ज खर्चासह मंजूर करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु.५००/- (रुपये पाचशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.
०२. खर्चाची रक्कम वि.प. यांनी पुढील तारखेपर्यंत अर्जदार यांना अदा करावी.

०३. खर्चाची रक्कम अर्जदार यांना दिल्यानंतर वि.प. यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याची परवानगी देण्यात येते.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SACHIN DURGASHANKAR MEHTA
Date: 2025.11.05 17:51:46 +0530

**( एस. डी. मेहता )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः ०५/११/२०२५.